KOKAN BHUMI PRATISHTHAN

कोकण भूमी प्रतिष्ठान

आयोजित

12th Edition

GLOBAL KOKAN™

FESTIVAL-2026

# GLOBAL KOKAN FESTIVAL 2026

18 FEB | 19 FEB | 20 FEB | 21 FEB | 22 FEB

SHIRGAON BEACH
PALGHAR



www.globalkokan.org / www.kokanclub.org

# संकल्पना

कोकण, परमेश्वराला पडलेलं एक सुंदर स्वप्न. जगभरातील पर्यटकांना जे अभिप्रेत आहे ते सागरकिनारे उत्तुंगकडे, हिलस्टेशन्स, नद्या, बॅकवॉटर्स, धबधबे, जंगले, अभयारण्ये, ऐतिहासिक वास्तू, किल्ले, प्राचीन मंदिरे, कला, संस्कृती, लोककला, ग्रामीण संस्कृती व खाद्य इ. सर्व काही ६० किमी मध्ये पहायला मिळते. बर्फ वगळता कोकणात सर्व काही आहे. कोकणाला ७२० किमीचा विस्तीर्ण सागरकिनारा लाभला आहे. समुद्रकिनाऱ्यांचे प्रचंड आकर्षण जगभरात आहे. विस्तीर्ण सागरकिनारपट्टी लाभलेल्या कोकणात १०० हून अधिक बीचेस आहेत. यातील गणपतीपुळे, गुहागर, श्रीवर्धन यांसारखे काही बीच वगळता अनेक बीच पर्यटकांना अजून अज्ञात आहेत. कोकणातील प्रसिध्द सागरकिनाऱ्यांवर पर्यटकांना माहित नसलेले समुद्रकिनारे प्रकाशात यावेत. या सागरकिनाऱ्यांना प्रसिध्दी मिळावी. येथे पर्यटन व्यवसायाचा विकास व्हावा. यासाठी ग्लोबल कोकण - शिरगाव बीच फेस्टीव्हलचे आयोजन करण्यात येत आहे.

कोकणातील सागरकिनाऱ्यांची प्रसिध्दी करुन मोठ्या प्रमाणात पर्यटक याठिकाणी आकर्षित करता येतील. बीच फेस्टीव्हलमध्ये सागरी पर्यटनाच्या विकासाबरोबरच प्रत्येक तालुक्यातील अनेक निसर्ग समृध्द गावे पर्यटकांना माहिती व्हावीत असा प्रयत्न केला जाणार आहे.

## आंतरराष्ट्रीय ग्लोबल कोकण फेस्टीव्हल

- मुंबई व महाराष्ट्रातील सर्वात मोठा महोत्सव.
- कोकणाला आंतरराष्ट्रीय प्रसिध्दी.
- सर्व पक्षाचे प्रमुख नेते कोकण विकासासाठी एका व्यासपीठावर.
- कोकणातील अनेक मान्यवर व उद्योजक यांची उपस्थिती.
- पर्यटन, बांधकाम, कोकण प्रोडक्ट सर्व उद्योजकांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ.
- नाट्य, कला, सिने क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती.
- दरवर्षी पाच लाखाहून अधिक कोकण प्रेमींची महोत्सवाला उपस्थिती.
- दरवर्षी पन्नास कोटीहून अधिक आर्थिक उलाढाल.
- महोत्सवामुळे पर्यटन उद्योगाला चालना व लाखो पर्यटक कोकणाकडे आकर्षित.
- कोकणात स्थानिक उद्योजकांच्या रियल इस्टेट प्रकल्पांना प्रोत्साहन यातून मोठ्या प्रकल्पांची निर्मिती.
- कोकणातील लोककला, खाद्यसंस्कृती यांना जागतिक व्यासपीठ.

### मागील कार्यक्रम

- २०११ - बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई (1st GKF)
- २०१२ - बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई (2nd GKF)
- २०१३ - नेस्को कॉम्प्लेक्स, गोरेगाव, मुंबई (3rd GKF)
- २०१३ - आंबा महोत्सव, लंडन
- २०१४ - सानपाडा, नवी मुंबई (4th GKF)
- २०१५ - नेस्को कॉम्प्लेक्स, गोरेगाव, मुंबई (5th GKF)
- २०१६ - ग्लोबल कोकण बीच महोत्सव - दापोली
- २०१७ - महागणेश महोत्सव, मुंबई
- २०१८ - सिडको एक्झिबिशन सेंटर, वाशी, नवी मुंबई (6th GKF)
- २०१८ - लक्ष्मी लॉन्स, मगरपट्टा, पुणे (7th GKF)
- २०१९ - नेस्को कॉम्प्लेक्स, गोरेगाव, मुंबई (8th GKF)
- २०२२ - नेस्को कॉम्प्लेक्स, गोरेगाव, मुंबई (9th GKF)
- २०२४ - के.डी.एम.सी. ग्राऊंड, डोंबिवली (10th GKF)
- २०२५ - नेस्को कॉम्प्लेक्स, गोरेगाव, मुंबई (11th GKF)







# International

## Tourism Mahotsav

पालघर पर्यटन
प्रसिध्दी आणि प्रमोशन

# कोकण ट्रॅव्हल मार्ट

कोकण! निसर्गाला पडलेलं एक सुंदर स्वप्न! पर्यटन हा कोकण विकासाचा मूलमंत्र आहे. कोकण पर्यटनाचे नियोजन व प्रसिध्दी जगभर केली तर देश व जगभरातून कोट्यावधी पर्यटक कोकणात येतील. कोकण पर्यटन प्रसिध्दीसाठी प्रतिष्ठान कोकणातील पालघर जिल्हयात बीच फेस्टीव्हल, ग्रामीण पर्यटन महोत्सव, पर्यटन परिषदा, टूर ऑपरेटर्सच्या परिषदा, प्रशिक्षण असे अनेक उपक्रम वर्षभर राबवित आहे. ग्लोबल कोकण महोत्सवाच्या माध्यमातून पालघर जिल्हयातील पर्यटनाला जागतिक स्तरावर नेण्याचा प्रयत्न आहे. ग्लोबल कोकणला पर्यटक व निसर्ग प्रेमींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देतात. यातून कोकण जगभर पोहोचण्यास मदत झाली आहे. यावर्षीच्या ग्लोबल कोकणमध्ये भव्य पर्यटन दालन उभारीत आहोत. प्रसिध्द पर्यटन व्यावसायिक पर्यटन कंपन्या, टूर ऑपरेटर, हॉटेल इंडस्ट्री यामध्ये सहभागी होत आहे.

## सांस्कृतिक व लोककला महोत्सव



कोकणातील लोककला, नृत्य आणि संगीताचे दिमाखदार सादरीकरण. परंपरा, संस्कृती आणि स्थानिक कलावंतांचा रंगतदार उत्सव. यामध्ये कोळीनृत्य, शेतकरी नृत्य, लावणी, जाखडी नृत्य, नमन, पालखीनृत्य, आदिवासीनृत्य, दशावतार, कोळीनृत्य अशा समृध्द लोककलांचा उत्सव.



## आदिवासी महोत्सव

पालघर हा आदिवासी बहुल जिल्हा आहे. आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात याठिकाणी राहतो. या समाजाने आपल्या परंपरा, आपली संस्कृती आजही जोपासली आहे. येथील तारपा नृत्य, ठाकर नृत्य, वारली चित्रकला हे पर्यटकांच्या आकर्षणाचे नेहमीच केंद्रबिंदू राहिले आहेत. आदिवासी संस्कृती, परंपरा आणि जीवनशैलीचा प्रत्यक्ष अनुभव. लोककला, नृत्य, हस्तकला आणि पारंपारिक घरे पाहण्याची संधी.



# ग्लोबल कोकण फेस्टीव्हलमधील विविध दालने



## शासन आणि प्रशासन दालन

भारताचे माजी अर्थमंत्री प्रख्यात सी. डी. देशमुख यांच्या महान वारशाला अभिवादन करणाऱ्या या मंडपात DOT, MMB, JNPT, FISHERIES BOARD, APEDA, MPEDA, MMRDA, MSRDC, CIDCO, ONGC, INDIAN OIL, GAIL, SGNP, BMC, Forest Dept आणि बरेच काही यासारखे केंद्र आणि राज्य सरकारी विभाग अमूल्य मार्गदर्शन आणि माहिती प्रदान करण्यासाठी एकत्र येतात. विविध सरकारी योजना, समर्थन प्रणाली आणि सुविधांबद्दल माहिती देतात, जे उद्योजक आणि अभ्यागत दोघांनाही त्यांच्या योजना आणि लोककल्याणासाठी कार्याबद्दल व दूरदर्शी प्रकल्पबद्दल माहिती देतात.



## ॲडव्हॉटेज पालघर

सर्वात वेगाने प्रगती करणारा आणि अमर्याद क्षमतांनी समृद्ध असा पालघर, पुढील ५-१० वर्षांत जागतिक दर्जाच्या सुविधांचे केंद्र म्हणून उदयास येत आहे. पर्यटन, पायाभूत सुविधा, रिअल इस्टेट, शहरी विकास, बंदर विस्तार, मत्स्यव्यवसाय आणि उद्योग क्षेत्रातील संधींमुळे जागतिक गुंतवणूकदारांचे आकर्षण झपाट्याने वाढत आहे. स्थानिक कष्टाळू समुदायासह देशभरातील गुंतवणूकदारांना पालघरच्या या उल्लेखनीय विकासाची रिअल-टाइम माहिती मिळावी म्हणूनच आम्ही ॲडव्हांटेज पालघर हे भव्य दालन उभारत आहोत. यामध्ये **MSRDC, MMRDA, MMB, JNPA** आदींचे पालघर जिल्हयातील विविध प्रकल्पांची माहितीदेखील दर्शवण्यात येईल.



## वने विभाग

कोकण हा वनसंपत्तीने समृध्द असा प्रदेश आहे. येथील जंगलात विविध प्रकारची जैवविविधता व वन्यप्राण्यांचे वास्तव्य आढळते.केंद्र शासनाने पश्चिम घाटास 'इको सेनसेटिव झोन' घोषित केल्याने या भागात पुरक असे उद्योग विकसित करणे, निसर्ग पर्यटन, पर्यटन आदींचे योजना व मार्गदर्शन. वन विभाग, महाराष्ट्र इको टूरिझम डेव्हलपमेंट बोर्ड, मॅनग्रुव्ह सेल, बांबू मिशन महाराष्ट्र, नागपूर, संजय गांधी नॅशनल पार्क - बोरीवली यांचा सहभाग असणारे दालन



## वाढवण बंदर प्रकल्प

पालघर जिल्हयातील १६ दशलक्ष टन क्षमता असणारे व जेएनपीए व एमएमबी याच्या सहभागातून ग्रीनफील्ड प्रकल्प - वाढवन बंदर विकसीत होत आहे. बंदर विकासातून निर्माण होणाऱ्या व्यवसायिक व उद्योग संधी, रोजगार संधी, उपक्रम, गुंतवणूक व प्रादेशिक विकास याचे सादरीकरण करणारे दालन.

# ग्लोबल कोकण फेस्टीव्हलमधील विविध दालने



## कृषी दालन

गेली २५-५० वर्ष प्रत्यक्ष कोकणात राहून शेती, हापूस आंबा,फळप्रक्रिया, कृषी, पर्यटन, कृषीपूरक, लघुउद्योग या विषयात प्रत्यक्ष काम करणारे कोकणातील उद्योजक व्यावसायिक मान्यवर व्यक्तिमत्वे यांची माहिती देणारा, यांच्या कामाची उद्योगाची उत्पादनांची प्रसिध्दी करणारे हे या महोत्सवातील दालन आहे तसेच शेती संदर्भातील विविध तंत्रज्ञान, आवश्यक मशिन, बी-बियाणे, औषधे व खते आदीची माहिती देणारे दालन उभारण्यात येणार आहे.



## मत्स्य दालन

कोकणाला ७२० किमीचा विस्तीर्ण सागरकिनारा लाभला आहे. कोकणच्या सागरात विविध प्रकारची जैवसंपदा व जैवविविधता आढळते. या सागरसंपत्तीचे दर्शन लोकांना व्हावे व कोकणची सागरी समृध्दता जगासमोर यावी, यासाठी कोळी समाज, कोळी संस्कृती, खाद्यसंस्कृती यांना मोठ्या प्रमाणात प्रदर्शित केले जाणार आहे. मत्स्यशेती संदर्भातील माहिती, तंत्रज्ञान आदीची माहिती देखील देण्यात येणार आहे.



## लघुउद्योग दालन (MSME)

पालघर, महाराष्ट्र व देशभरातील छोटे उद्योजक, लघु व सूक्ष्म उद्योजक यांच्या सहभागातून हे भव्य दालन उभारण्यात येणार आहे. या उद्योजकांना एक मोठे व्यासपीठ या निमित्ताने मिळू शकेल. लघु उद्योजकांच्या उत्पादनांचे ब्रँडींग मार्केटिंग आणि प्रमोशन भव्य प्रमाणात या महोत्सवात केले जाईल. या प्रदर्शनातील हे सर्वात प्रमुख दालन आहे. यासाठी MSME या केंद्र सरकारच्या विभागाचे विशेष सहकार्य मिळत आहे.



Umed
New Horizon, Renewed Confidence...
Maharashtra State Rural Livelihoods Mission (MSRLM)

## कोकण सरस
### वीर माता लक्ष्मीबाई नेवाळकर महिला उद्योजक दालन

राज्य शासनाच्या विभागाच्या मदतीने कोकणातील, महाराष्ट्रातील महिला उद्योजकांसाठी हे विशेष दालन उभारण्यात येणार आहे. महिला उद्योजकांनी बनवलेली उत्पादने यांचे विशेष ब्रँडींग प्रसिध्दी व प्रमोशन या दालनात करण्यात येईल. महिला उद्योजकांना सक्षम करण्यासाठी आणि त्यांचे उत्पादने प्रदर्शन करण्यासाठी एक समर्पित व्यासपीठ कोकण सरस उद्योजक पॅव्हेलियन सादर करत आहोत.

# ग्लोबल कोकण फेस्टीव्हलमधील विविध दालने



## पालघर इंडस्ट्रीज दालन

पालघर जिल्हा हे महाराष्ट्रातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या औद्योगिक पॉवरहाऊसपैकी एक म्हणून उदयास येत आहे. या वर्षीच्या कार्यक्रमात, विविध सरकारी विभाग बंदर आणि जहाज बांधणी, अभियांत्रिकी, औषधनिर्माण, जैवतंत्रज्ञान, पेट्रोकेमिकल्स आणि तेल आणि वायू क्षेत्र यासारख्या क्षेत्रातील उद्योगांच्या क्षमता आणि अपेक्षित भविष्यातील व संधी यांचे अनावरण करण्यासाठी सज्ज आहेत. आयटी (माहिती तंत्रज्ञान) क्षेत्र देखील या प्रदेशात आपला विस्तार करत आहे. आम्ही कोकणातील विद्यमान कंपन्यांना त्यांची उत्पादने, कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) उपक्रम आणि सामाजिक कल्याणातील योगदान यावर प्रकाश टाकण्यास प्रोत्साहित करतो. या औद्योगिक महोत्सवात MIDC आणि मेक इन इंडिया सारख्या प्रमुख संस्था आमच्यासोबत सामील होत आहेत



## बांधकाम उद्योग (रियल इस्टेट) दालन

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, वसई-विरार, महामुंबई, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग येथील बांधकाम उद्योग (रियल इस्टेट) या विषयात भव्य दालन उभारत आहोत. कोकणाच्या आर्थिक विकासासाठी कोकण प्रदेशात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक व्हावी हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. कोकणात बांधकाम क्षेत्रात व पायाभूत सुविधा निर्माण क्षेत्रात काम करणारे उद्योजक आणि या व्यवसायातील संस्था यांनी यावर्षी ग्लोबल कोकणमध्ये सहभागी व्हावे अशी संकल्पना आहे. कोकणातील शहरांचा विकास व बांधकाम क्षेत्रात कोकणातील गुंतवणूकीच्या संधी या दृष्टीने भव्य रिअल इस्टेट दालन यावेळी उभारत आहोत.



## मेक इन कोकण अभियान

### कोकण समृद्धीचा मार्ग

कोकण हे विकासाचे गतिमान केंद्र म्हणून झपाट्याने उदयास येत असून असंख्य उद्योजक आणि महत्त्वाकांक्षी तरुणांना आकर्षित करत आहे. आमच्या या समर्पित व्यासपीठावर, उद्योजकीय स्वप्नांना गती देण्यासाठी विविध संधी, सरकारी योजना आणि प्रोत्साहनांचा विस्तृत संच सादर केला आहे. पर्यटन विभाग, सिडको, एमआयडीसी, एमएमआरडीए, कृषी विभाग, मत्स्यव्यवसाय विभाग आणि पर्यटन विभाग यासह विविध सरकारी महामंडळांनी तयार केलेल्या धोरणात्मक योजनांचा लाभ व माहिती या माध्यमातून मिळू शकेल. तज्ञांची टीम इच्छुक उद्योजकांना प्रकल्प व्यवस्थापन, प्रशिक्षण आणि स्टार्टअप्सना भरभराटीसाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन करण्यासाठी सज्ज आहे.



## पालघर फूड फेस्टिव्हल

पालघर फूड फेस्टिव्हलमध्ये पाककृती साहसाचा आनंद घ्या, जिथे कोकणच्या उत्कृष्ट चवी जिवंत होतात. सागुतीवडे, मोदक, थालीपीठ, पुरणपोळी, सावजी मांसाहारी पदार्थ आणि कोकण, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम आणि उत्तर महाराष्ट्राच्या समृद्ध पाककृती परंपरांचे प्रतिनिधित्व करणारे विविध प्रकारचे पदार्थ यासारखे स्वादिष्ट पदार्थ चाखण्याचा आनंद घेता येईल. हा महोत्सव इंद्रियांसाठी एक मेजवानी आहे, पालघर जिल्ह्यातील खाद्यसंस्कृती देखील याठिकाणी अनुभवता येईल.

# बीच फेस्टीव्हलमधील विविध उपक्रम



## बीच टेन्ट व्हिलेज

समुद्रकिनाऱ्यालगत आकर्षक टेन्ट स्टे, निसर्गाच्या सान्निध्यात सुरक्षित आणि आरामदायी निवास, कुटुंबांसाठी आणि मित्रांसाठी खास बीच ॲक्टिव्हिटीज, लाईव्ह म्युझिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद



## बीच मॉडर्न कॅफे

समुद्रकिनाऱ्यावर आधुनिक स्टाईलमधील फूड अनुभव, सुंदर बीच व्ह्यूसोबत रिलॅक्स फूड एन्जॉयमेंट, कोकणी स्वादासोबत फ्युजन डिशेसची मेजवानी



## पारंपारिक खाद्य कॅफे

अस्सल कोकणी, कोळी, आगरी आणि इतर पारंपारिक जेवणाची खास मेजवानी, घरगुती चवीचे पदार्थ आणि स्थानिक पाककलेचा अनुभव, ताजे, पौष्टिक आणि संस्कृतीची चव जपणारे जेवण.



## फिशरमन व्हिलेज

किनारपट्टीवरील फिशरमन संस्कृती, लोककला, जीवनमान पध्दत, उद्योग आदी दर्शवणारे थीम पार्क



## वॉटरस्पोर्टस्

कोकणात वॉटरस्पोर्टच्या माध्यमातून सागरी पर्यटनास प्रचंड वाव. ज्या सागरी किनाऱ्यावर शक्य असेल तेथे बनाना राईड्स्, जेस्ट स्की अशा विविध वॉटरस्पोर्टसची सुविधा उपलब्ध.



## बीच स्पोर्टस

बीच फेस्टीव्हल दरम्यान बीच हॉलिबॉल, क्रिकेट, आबाधुबी, विटी-दांडू, भोवरा, वाळू शिल्प अशा विविध खेळांचे आयोजन. यामध्ये पर्यटकांचा तसेच स्थानिकांना सहभाग.



## कला दालन

राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर ठसा उमटविणाऱ्या कोकणातील कलाकारांच्या वैशिष्टयपूर्ण कलाकृतींचे प्रदर्शन.



## पतंग महोत्सव

सागरकिनाऱ्यांवर विविध आकाराच्या पतंगाचा पतंग महोत्सवाचे आयोजन. यामध्ये स्थानिकांचा तसेच पर्यटकांचा सहभाग.

# मागील महोत्सवाची क्षणचित्रे

## शासन सहभाग










## कोकण गौरव दालन








## रिअल इस्टेट व उद्योजक










## मेक इन इंडिया व बँक















# मागील महोत्सवाची क्षणचित्रे

## आदिवासी व फूड सहभाग




## कृषी सहभाग




## मत्स्य सहभाग




## उत्स्फूर्त प्रतिसाद



# प्रमुख सहभाग



# प्रशंसापत्र

### मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब
मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य



जागतिक कोकण महोत्सवाच्या निमित्ताने राजकीय मतभेद बाजूला ठेवून हा उल्लेखनीय कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल मी तुम्हा सर्वांचे मनापासून अभिनंदन आणि आभार मानतो. योग्य धोरणांच्या अंमलबजावणीमुळे, परिस्थिती बदलेल आणि लोक मुंबईहून कोकणात प्रवास करतील, ज्यामुळे कोकणाची समृद्धी होईल. या परिवर्तनामुळे तरुणांसाठी भरपूर संधी निर्माण होतील आणि शेवटी कोकण एक प्रमुख जागतिक पर्यटन स्थळ म्हणून स्थान मिळवेल.

### मा. एकनाथराव शिंदेसाहेब
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



कोकण प्रदेशातील कष्टाळू लोकांनी आपापल्या क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे. कोकणची प्रगती कधीही मागे पडू नये असा माझा दृढ विश्वास आहे आणि जेव्हा संपूर्ण समुदाय एकत्र येतो तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने त्याचा विकास साध्य करू शकतो. राज्य सरकार कोकणच्या प्रगतीला आपला अटळ पाठिंबा देण्याचे मनापासून वचन देते. या सुंदर प्रदेशात पर्यटनाला चालना देण्यासाठी, जागतिक कोकण महोत्सवादरम्यान केलेल्या विनंत्या पूर्ण करण्यासाठी आम्ही तुमच्या सक्रिय सहभागाला प्रोत्साहन देतो.

### मा. अजितदादा पवारसाहेब
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



कोकणच्या विस्तृत किनारपट्टीचा विस्तार आणि प्रत्येक कोपऱ्याला सजवणारे नितांत सौंदर्य लक्षात घेता, आपल्याला पर्यटनासाठी एक उल्लेखनीय संधी उपलब्ध झालेली दिसते. कोकणकडे आपला दृष्टिकोन बदलणे आणि त्याच्या पर्यटन क्षमतेचा स्वीकार करणे अत्यंत आवश्यक आहे. कोकण पर्यटनाच्या प्रगतीसाठी आगामी अर्थसंकल्पात मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद जाहीर करताना मला आनंद होत आहे. कोकण भूमी प्रतिष्ठान कोकणातील सर्व विकास प्रयत्नांसाठी केंद्रीय समन्वयक म्हणून काम करेल.

### मा. गणेशजी नाईकसाहेब
वनमंत्री, महाराष्ट्र राज्य



आमच्या सुव्यवस्थित कार्यक्रमाचे यश पाहणे खरोखरच प्रेरणादायी आहे. तुमचे सामूहिक प्रयत्न उल्लेखनीय आहेत आणि कोकणच्या विकासासाठी तुमच्या वचनबद्धतेमध्ये हा उत्साह कायम ठेवावा अशी मी तुम्हाला विनंती करतो. आज कोकणातील तुमच्या समर्पित कार्यात महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला लक्षणीयरीत्या चालना देण्याची क्षमता आहे. चला हे उत्तम कार्य चालू ठेवूया !

### मा. उदयजी सामंतसाहेब
उद्योग व मराठी भाषा मंत्री, महाराष्ट्र राज्य



कोकणच्या विकासाची अफाट क्षमता ओळखल्याबद्दल आम्ही ग्लोबल कोकणचे आभार मानतो, जी कोकण उत्पादनांच्या कार्यक्षम उत्पादनात आहे. या आकर्षणाचा वापर करून, आम्ही कोकणच्या नैसर्गिक सौंदर्याला प्रोत्साहन देऊन आणि विकासाला चालना देऊन त्याची समृद्धी जपण्यासाठी समर्पित आहोत. भारत राज्याच्या विकासात एक महत्त्वपूर्ण योगदानकर्ता म्हणून सातत्याने उदयास येत आहे.

### मा. शंभूराजे देसाईसाहेब
पर्यटनमंत्री, महाराष्ट्र राज्य



ग्लोबल कोकणची संकल्पना मांडल्याबद्दल मी जीकेएफ आयोजकांचे आभार मानू इच्छितो. मेक इन कोकणच्या माध्यमातून कोकण विकसित करताना उत्पादित झालेल्या वस्तू आपल्याला पाहायला मिळाल्या, कोकणचा दर्जा कसा टिकवायचा याचा विचार करावा लागेल. आम्ही लवकरच कोकणात पर्यटनाशी संबंधित एक संस्था सुरू करत आहोत.

मार्गदर्शक



मा. राजेंद्रजी गावीत
आमदार



मा. भाई जगताप
आमदार



मा. प्रसाद लाड
आमदार

कार्याध्यक्ष



मा. राजीव पाटील
प्रथम महापौर, वसई-विरार महा.

प्रमुख संयोजक



श्री. संजय यादवराव
अध्यक्ष, कोकण भूमी प्रतिष्ठान

# मागील प्रायोजक आणि सहभागी

Office No. C Block - 119, 1st Floor, Ranjit Studio Compound, Dadasaheb Phalke Road, Dadar (E), Mumbai - 400014.
www.globalkokan.org
9082550774
globalkokan75@gmail.com
samruddhamarathi@gmail.com